RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# वाई तालुक्यातील कृषी पर्यटन: सद्यस्थिती आणि भवितव्य

**प्रा. प्रमोद घाटगे**
सहाय्यक प्राध्यापक
आमदार शशिकांत शिंदे महाविदयालय, मेढा

## प्रास्ताविक

जागतिकीकरणाच्या युगात शाश्वत विकासाच्या संकल्पनेला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे, विशेषत; शेती क्षेत्रामध्ये शाश्वत विकासाची संकल्पना खूप महत्वाची मानली जात आहे, अलिकडील काळात शेतीच्या शाश्वत विकासाची गुरूकिल्ली म्हणून कृषी पर्यटन या संकल्पनेला विशेष महत्व प्राप्त झालेले आहेत. कृषी पर्यटनासारखा नवा प्रयोग कृषी क्षेत्राला उभारी देणारा, कृषीला नेत्रदिपक यश मिळवून देणारा कृषीची शान उंचावणारा आणि कृषीला अग्रक्रमांकावर नेणारा असल्याचे सिध्द झाले आहे. कृषीच्या शाश्वत विकासाचा मुलाधार म्हणून कृषी पर्यटनाकडे पाहिले जात आहे.

## कृषी पर्यटन अर्थ

कृषी पर्यटनामध्ये कृषी आणि पर्यटन या दोन विभांगामध्ये मिलाप घडवून आणला जातो. स्वतः शेतक—याने आपल्या  फळे, फुले आणि पालेभाज्या यांनी समृध्द अशा शेतावरच आयोजित केलेली आनंददायी शिक्षण व मौज यांचा सुंदर मिलाफ म्हणजे कृषी पर्यटन होय. अशी या संकल्पनेची व्याख्या केली जाते. कृषी पर्यटनासारख्या माध्यमातून शहरी पर्यटकांना ग्रामीण संस्कृतीचे ख—या अर्थाने दर्शन होते. शेतीतील विविध पैलुंच्या अनुभवाबरोबरच प्रदुषणमुक्त वातावरणचा आस्वाद घेता येतो. थोडक्यात ग्रामीण संस्कृतीचा निर्भेळ आनंद लुटून प्रसन्न मनाने पुन्हा पर्यटक आपल्या शहराकडे जातात.

प्रस्तुत शोधनिबंधामधून सातारा जिल्हयातील वाई तालूक्यातील कृषी पर्यटन विकासाची सद्यःस्थिती, वाटचाल आणि भवितव्य याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## अभ्यासाची उद्दिष्टे

प्रस्तुत अभ्यास खालील प्रमुख उददेशाने केला आहे.

१. कृषी पर्यटनाची सद्यःस्थिती अभ्यासणे
२. कृषी पर्यटन केंद्राची कार्यपध्दती/व्यवस्थापन समजून घेणे.
३. कृषी पर्यटनाच्या विकासाचा आढावा घेणे.
४. कृषी पर्यटनाचे भवितव्य आजमावने.

## अभ्यासपध्दती

प्रस्तुत अभ्यासासाठी कृषी पर्यटन केंद्रांना प्रत्यक्ष भेट देवून त्यांची पहाणी करण्यात आली. निरीक्षणातून काही महत्वाच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. तसेच कृषी पर्यटन प्रकल्प राबविलेल्या काही शेतक—यांच्या मुलाखती घेवून माहिती मिळविली आहे. तसेच दुय्यम सामग्री म्हणून विविध शेतकरी अंक कृषी विभागाच्या वेबसाईटवरून दुय्यम माहिती मिळविली आहे.

## अभ्यासाची व्याप्ती

प्रस्तुत अभ्यासाकरिता वाई तालुक्यातील बापु फार्म कृषी पर्यटन केंद्र व ऋतु फार्म या प्रमुख दोन पर्यटन केंद्रांची निवड केली आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## वाई तालुक्यातील कृषी पर्यटन सद्यस्थिती

वाई तालुक्यातील सद्यःस्थितीमध्ये एकूण अकरा कृषी पर्यटन केंद्रे विकसित होत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने खालील केंद्राचा समावेश आहे.

१. बापु फार्म कृषी पर्यटन केंद्र
२. ऋतु फार्म कृषी पर्यटन केंद्र
3. सृष्टी फार्म कृषी पर्यटन केंद्र
४. चिरगुटे फार्म कृषी पर्यटन केंद्र
५ नातु फार्म कृषी पर्यटन केंद्र
६. सोनाई फार्म कृषी पर्यटन केंद्र
७. पोरे फार्म कृषी पर्यटन केंद्र
८. मांढरे फार्म कृषी पर्यटन केंद्र
९.. दगडे फार्म कृषी पर्यटन केंद्र
१०. पिसाळ फार्म कृषी पर्यटन केंद्र
११. जायगुडे फार्म कृषी पर्यटन केंद्र

वाई तालुक्यामध्ये सन 2009 मध्ये वाई तालुका कृषी आणि ग्रामीण पर्यटन सहकारी सोसायटीची (Agro and Rural Tourism Co-Operative Society) स्थापना झाली आहे. या सोसायटीच्या स्थापनेपासूनच ख–या अर्थाने वाई कृषी पर्यटनाच्या विकासाला चालना मिळाली आहे. वरील सोसायटीच्या माध्यमातून अधिकाधिक शेतक–यांना कृषी पर्यटनाकडे आकर्षित करून त्यांना त्यासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. तसेच शेतक–यांना कृषी पर्यटनाविषयी प्रशिक्षण देण्याचे कार्य या सोसायटीमार्फत केले जाते.

### १. बापु फार्म कृषी पर्यटन केंद्र

वाई तालुक्यामध्ये वाई महाबळेश्वर रस्त्यालगत श्री मधुकर चौधरी यांनी बापु फार्म कृषी पर्यटन केंद्र त्यांच्या स्वतःच्या 5 एकर शेतावर सन २००९ पासून सुरू केले आहे. हे केंद्र स्थापन करण्याची मूळ कल्पना त्यांनी कृषी पर्यटनाचे मुख्य प्रवर्तक श्री. चंद्रशेखर भडसावळे यांच्याकडून घेतली आहे. श्री. मधुकर चौधरी यांनी महाराष्ट राज्य कृषी पर्यटन फेडरेशन यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात प्रथम वाई तालुका कृषी व ग्रामीण पर्यटन सह. सोसायटीची (Agro and Rural Tourism Co-Operative Society) स्थापना करण्यात पुढाकार घेतला. व वाई तालुक्यामध्ये सर्वप्रथम कृषी पर्यटन केंद्रांची स्थापना करून इतर शेतक–यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे तालुक्यात कृषी पर्यटनाच्या विकासाला वेग आलेला आहे. या केंद्राची उभारणी करण्यासाठी श्री. चौधरी यांनी बॅंक ऑफ महाराष्ट शाखेकडून रू. ५ लाखाचे अर्थसहाय्य घेतले आहे. या कृषी पर्यटन केंद्राची ठळक वैशिष्टये खालील प्रमाणे आहेत.

१. निसर्गरम्य परिसर
२. सर्व प्रकारच्या भौतिक सुविधांनी युक्त
३० मनोरंजनाच्या विविध सोयी
४ प्रदूषणमुक्त वातावरण
५ पर्यटकांचे आदरातिथ्य, स्वागत व पाहूणचार
६. पॅकेज टुरची सुविधा
७. अस्सल गावरान पध्दतीच्या भोजनाची सोय.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

आपल्या ५ एकराच्या परिसरामध्ये श्री. मधुकर चौधरी यांनी आपल्या शेतावर विविध प्रकारच्या पालेभाज्या, आले, ऊस, स्टॉबेरी, केळी,आवळा, आंबा,फ्लॉवर, मका यांसारख्या विविध पिकांचे व फळांचे उत्पादन घेतले आहे. तसेच विविध प्रकारची फुलझाडे व औषधी वनस्पतींची लागवड करून निसर्गरम्य पर्यटन स्थळ विकसित केले आहे.

बापु फार्म केंद्रावर पर्यटकांना निवास व्यवस्थेसाठी दोन कुटुंबांसाठी व्यवस्था आहे. त्याकरिता निवास व्यवस्थेसाठी प्रतिदिन १५०० रू. भाडे आकारले जाते. या केंद्रावर महाराष्टातील विविध जिल्हयातून तसेच आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरात या राज्यांतून पर्यटक येतात. पर्यटकांना खेळ, मनोरंजन यांसारख्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. पर्यटकांच्या मागणीनुसार त्यांना भोजनाचे विविध पदार्थ शेतातील सर्व प्रकारच्या ताज्या भाज्या, हुर्डा पार्टी, फळे इ. उपलब्ध करून दिली जातात. तसेच वर्षा सहलीचे आयोजन पावसाळयामध्ये केले जाते. त्यामुळे या केंद्राला संपूर्ण वर्षभर पर्यटक येत असतात. विशेषतः सुटट्ीच्या कालावधीत आणि वर्षातील डिसेंबर ते मे या कालावधीत पर्यटकांची संख्या जास्त असते. या पर्यटन स्थळापासून महाबळेश्वर, प्रतापगड, मांढरदेवी, धोम डॅम, वाईचा प्रसिध्द गणपती इ. पर्यटन स्थळे जवळच असल्यामुळे या केंद्राला वर्षभर चांगले उत्पन्न मिळते. तसेच पर्यटक शेतावरच शेती वस्तूंची खरेदी करतात. त्यामुळे शेतमालाला एकप्रकारे शेतावरच बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

### २. ऋतु फार्म कृषी पर्यटन केंद्र

वाईपासून 3 कि.मी अंतरावर पसरणी गावामध्ये श्री. महांगडे यांचे त्यांच्या स्वतःच्या ४.५ एकर शेतीमध्ये ऋतु फार्म कृषी पर्यटन केंद्र सन २०१० पासून सुरू केले आहे. त्यासाठी त्यासाठी सातारा जिल्हा मध्य. सहकारी बॅंकेचे अर्थसहाय्य घेतले आहे. तसेच नाबार्डकडून या प्रकल्पाला रू. २५ लाख एवढे अर्थसहाय्य मिळाले आहे. पर्यटकांसाठी सर्व सोईंनीयुक्त अशी निवास व्यवस्था करण्यात आली आहे. ५0 पर्यटकांची निवास व्यवस्था या केंद्रावर असून निवासाचा एका दिवसाचा दर एका रूमसाठी रू. २000 इतका आहे. या केंद्रावर पर्यटकांसाठी ऑनलाईन बुकींगची सुविधा करण्यात आली आहे. राज्याच्या विविध भागातून तसेच इतर राज्यातून पर्यटक या केंद्रावर येतात. पर्यटकांच्या मनोरंजनासाठी विविध खेळांचे साहित्य बैलगाडी सफर, टांगा सफर यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

### वाई तालुक्यातील कृषी पर्यटनाचे फायदे

वाई तालुक्यात विकसीत होत असलेल्या वरील कृषी पर्यटन केंद्रांमुळे शेतकरी पर्यटक व त्याबरोबरच इतर क्षेत्रातील लोकांना विविध प्रकारचे फायदे होत आहेत. ते पुढील स्वरूपाचे आहेत.

१. कृषी पर्यटनामुळे तालुक्यात रोजगार संधी निर्माण होत आहेत.
२. कृषी पर्यटनामुळे शेतीकडे बघण्याचा शेतक—यांचा सकारात्मक दृष्टीकोन बनत आहे.
3. तालुक्यातील ग्रामीण तरूणांचा शेतीकडील कल वाढत आहे.
४. शेतक—यांना चांगल्या उत्पन्नाची संधी निर्माण झालेली आहे.
५. तालुक्यातील बचत गटांच्या विविध उत्पादनांना स्थानिक बाजारपेठ उपलब्ध होत आहे.
६. तालुक्यातील वाहन धारकांना विशेषतः टॅक्सी, रिक्षा, मिनी बस, टांगे इत्यादींना उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध होत आहेत.
७. कृषी पर्यटनामुळे शेतक—यांचा थेट ग्राहकांशी संपर्क आल्यामुळे शेतमाल विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे.
८. कृषी पर्यटनामुळे तालुक्यातील शेती व्यवसायाला व्यापारी स्वरूप प्राप्त होत आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

९. कृषी पर्यटनामुळे शेतक–यांच्या कुटुंबात ऐक्य, जिव्हाळा, आदर, प्रेमभावना व त्याबरोबरच कुटुंबात प्रसन्नदायी वातावरण निमार्ण होण्यास मदत झाली आहे.
१०. शेतकरी कुटुंब व पर्यटक यांच्यात या व्यवसायामुळे दृढ नाते निर्माण होत आहे.
११. पर्यटकांची मागणी असलेल्या विविध वस्तू उदा. आवळा, स्टॉबेरी, विविध प्रकारची फुले व फळे यांसारख्या वस्तूंचे उत्पादन घेण्याकडे शेतक–यांचा कल वाढत असल्याचे दिसते. कारण त्यातून शेतक–यांना खात्रीशीर उत्पन्न मिळण्यास मदत झाली आहे.
१२. तालुक्यातील ग्रामीण लोककला, परंपरा, सन, उत्सव इ. ना कृषी पर्यटनामुळे नवसंजिवनी प्राप्त होत आहे.
१३. तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाला कृषी पर्यटनामुळे हातभार लागत आहे.

**कृषी पर्यटनाचे भवितव्य**

वाई तालुक्यात विकसित होत असलेल्या कृषी पर्यटनावरून असे दिसून येते की, पुढील काळात कृषी पर्यटन व्यवसायाला अधिका–
धिक वाव आहे. वाई तालुका हा शैक्षणिक दृष्ट्या विद्येचे माहेरघर मानला जातो. येथील तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी निर्मिती केलेल्या विश्वकोषामुळे वाई तालुक्याला देशात मानाचे स्थान आहे. तसेच भौगोलिक व पर्यावरणीय दृष्टया वाई तालुक्याला निसर्ग संपन्न असा प्रदेश लाभलेला आहे. वाईपासून जवळच असलेल्या महाबळेश्वर, प्रतापगड, मांढरदेवी, वाईचा महागणपती, धोम धरण यांसारख्या प्रसिध्द पर्यटन स्थळामुळे वाई तालुक्यात पर्यटकांचा ओघ सतत चालू असतो. त्याचा कृषी पर्यटन विकासाला निश्चितच हातभार लागणार आहे. तसेच कृषी पर्यटन व्यवसायामुळे वाई तालुक्याच्या शैक्षणिक व सामाजिक विकासाला गती मिळणार आहे. शेतक–यामध्ये आशावादी दृष्टिकोन निर्माण होवून कृषी पर्यटन व्यवसाय वाई तालुक्याच्या विकासातील एक महत्वाचा घटक बनेल. त्याबरोबरच सद्य परिस्थितीत वाई तालुक्यात विकसित होत असलेल्या विविध कृषी पर्यटन केंद्रामुळे सातारा जिल्हयातील इतर तालुक्यांमध्येही कृषी पर्यटन चळवळीला प्रोत्साहन मिळणार आहे.

**संदर्भ**

1. WWW.agritourism.in
2. शेतकरी मासीक विविध अंक
3. बापु कृषी पर्यटन केंद्रातून मिळालेली माहिती
4. ऋतु पर्यटन केंद्रावरून मिळालेली माहिती